

# २३ वा वार्षिक अहवाल
## २०१८-१९
ऑडीट वर्ग- 'अ'




आपल्या स्वप्नांना आकार देणारी...

# हुतात्मा सहकारी बँक लि., वाळवा
ता. वाळवा, जि. सांगली.

# हुतात्मा सहकारी बँक लि., वाळवा.

## संचालक मंडळ



**श्री. किरण नागनाथ नायकवडी**
चेअरमन



**श्री. महंमद अली चाऊस**
व्हा. चेअरमन



**सौ. नंदिनी वैभव नायकवडी**
संचालिका



**स्व.सौ. सुमती शामगौंडा पाटील**
संचालिका
(दि. ०६/०२/२०१९ अखेर)



**श्री. भिमराव कृष्णा कदम**
संचालक



**श्री. गंगाराम रामचंद्र सुर्यवंशी**
संचालक



**श्री. रामचंद्र हणमंत पाटील**
संचालक



**श्री. अर्जुन निवृत्ती वडगांवे**
संचालक



**श्री. दिलीप कृष्णराव पाटील**
संचालक



**श्री. प्रकाश बापू जाधव**
संचालक
(दि. १८/०४/२०१८ अखेर)



**श्री. श्रीकांत तुकाराम आंबी**
संचालक



**श्री. बाजीराव ईश्वरा मांगलेकर**
संचालक



**श्री. शरद रघुनाथ खोत**
संचालक



**श्री. आनंदराव राजाराम थोरात**
संचालक



**श्री. अरुण शंकरराव यादव**
संचालक



**श्री. नारायण हिंदूराव गुरव**
संचालक



**श्री. पोपट धुळाप्पा कांबळे**
संचालक



**श्री. बिपीन एस. शेटे**
तज्ञ संचालक



**श्री. श्रीनिवास एन. भोसले**
तज्ञ संचालक



क्रांतिवीरांगना

# सौ. लक्ष्मीबाई नायकवडी



पद्मभूषण क्रांतिवीर

डॉ. नागनाथ (अण्णा) नायकवडी



श्रीमती कुसुमताई नागनाथ नायकवडी (माईसाहेब)



**स्व. अरुण (भैय्या) नायकवडी**

संस्थापक-चेअरमन, हुतात्मा सहकारी बँक लि., वाळवा.



पद्मभूषण क्रांतिवीर डॉ. नागनाथअण्णा  नायकवडी
सौ. कुसूमताई नायकवडी (माईसाहेब)

क्षितीज आधुनिकतेचे..! नेतृत्व दूरदृष्टीचे.....!!



**मा. वैभव (काका) नायकवडी**

संस्थापक, हुतात्मा सहकारी बँक लि., वाळवा



## मा. किरण (दादा) नायकवडी

चेअरमन, हुतात्मा सहकारी बँक लि., वाळवा

# श्रध्दांजली...!

पद्मभूषण क्रांतीवीर डॉ. नागनाथ अण्णा नायकवडी यांच्या पत्नी व हुतात्मा शिक्षण व उद्योग समूहाच्या मार्गदर्शिका श्रीमती कुसुमताई नागनाथ नायकवडी (माई), पद्मभुषण क्रांतीवीर डॉ. नागनाथअण्णा नायकवडी यांच्या वहिनी श्रीमती हौसाबाई शामराव नायकवडी (काकी), विधान परिषदेचे माजी सभापती शिवाजीराव देशमुख, माजी आमदार विलासराव शिंदे, ज्येष्ठ साहित्यिक डॉ. गिरीष कर्नाड, वनश्री नानासाहेब महाडीक, बँकेचे व्हा. चेअरमन श्री. महंमद अली चाऊस यांच्या पत्नी जैनफ महंमद चाऊस, बँकेच्या विद्यमान संचालिका सौ. सुमती शामगौंडा पाटील, बँकेचे संचालक श्री. शरद रघुनाथ खोत यांचे बंधु दिलीप रघुनाथ खोत, बँकेचे माजी संचालक ईश्वर बापू मांगलेकर, हुतात्मा शिक्षण व उद्योग समुहातील कार्यकर्ते श्री. मोहन शामराव सव्वाशे, तसेच पुलवामा येथील दहशतवादी कारवाई मध्ये शहीद झालेले जवान, अहवाल सालात व आजपर्यंत भारतातील सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, आर्थिक, सांस्कृतिक, साहित्यिक आणि सहकार आदी विविध क्षेत्रातील दिवंगत झालेले थोर नेते, शास्त्रज्ञ, तंत्रज्ञ, शिक्षणतज्ञ, कवी, लेखक, गायक, उद्योजक, संगीतकार, खेळाडू, कलाकार, जवान, शेतकरी, कृषीतज्ञ, हुतात्मा संकुलातील संस्थांचे मृत पावलेले सभासद, कर्मचारी आणि नैसर्गिक आपत्ती व महापूरामुळे आपले जीवन गमावलेल्या विविध राज्यातील बंधू-भगिनींच्या निधनामुळे या सभेस दु:ख होत आहे. सर्वांच्या कुटुंबियांच्या दु:खात बँक सहभागी होत असून मृत व्यक्तिंच्या पवित्र स्मृतीस आपले सर्वांचे वतीने भावपूर्ण विनम्र श्रद्धांजली !

सर्व दिवंगतांच्या आत्म्यास चिरशांती व सद्‌गती लाभो हिच परमेश्वर चरणी प्रार्थना!



# हुतात्मा सहकारी बँक लि., वाळवा.

## वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

(फक्त सभासदांकरिता)

हुतात्मा सहकारी बँक लि., वाळवा या बँकेची २३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार, दि. १५ सप्टेंबर २०१९ रोजी दुपारी ठीक ३.०० वाजता कामगार भवन, ''क्रांतिमाता सौ. लक्ष्मीबाई नायकवडी सभागृह'' वाळवा, ता. वाळवा, जि. सांगली, येथे खालील विषयांवर विचार विनिमय करणेसाठी आयोजीत केली आहे. तरी सर्व सभासदांनी सभेस उपस्थित रहावे, ही नम्र विनंती.

### - सभेपुढील विषय -

१) दि. १९/०८/२०१८ रोजी संपन्न झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
२) दि. ३१ मार्च २०१९ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाचा वार्षिक अहवाल, ताळेबंद व नफा-तोटा पत्रकास मंजूरी देणे.
३) मा. संचालक मंडळाने शिफारस केलेल्या सन २०१८-१९ च्या नफा विभागणीस मंजूरी देणे व लाभांश जाहीर करणे.
४) सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाच्या वैधानिक लेखापरिक्षण अहवालाची नोंद घेणे.
५) सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाच्या वैधानिक लेखापरिक्षण अहवालाच्या दोष-दुरुस्ती अहवाल बँकेने सहकार खात्याकडे सादर केला आहे. तो वाचून स्वीकारणे.
६) सन २०१८-१९ या आर्थिक वर्षामध्ये अंदाजपत्रकापेक्षा जादा झालेल्या खर्चास मंजूरी देणे.
७) सन २०१९-२० या आर्थिक वर्षामधील अंदाजपत्रक मंजूर करणे.
८) सन २०१९-२० या आर्थिक वर्षाकरिता वैधानिक लेखापरीक्षक यांची नियुक्ती करणे व त्यांचा मेहनताना ठरविणे.
९) सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षाकरीता अंतर्गत लेखापरिक्षक, कंकरंट ऑडिटर, ईडीपी ऑडिटर यांच्या नेमणूका करणे व त्यांचा मेहनताना ठरविणे.
१०) महाराष्ट्र शासनाच्या एकरकमी कर्ज परतफेड योजनेअंतर्गत थकीत कर्ज रक्कमा भरण्यासाठी दिलेल्या सवलीतीची नोंद घेणे.
११) बँकेच्या सभासदांची वैयक्तिक भागधारण मर्यादा ठरविणे, याबाबत आदर्श उपविधीमधील (बॉयलॉज) पोटनियम नं. ५६ दुरूस्तीस मान्यता देणे.
१२) बँकेचे संचालक व त्यांच्या नातेवाईकांना दिलेल्या कर्जाची नोंद घेणे.
१३) वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थित नसलेल्या सभासदांच्या अनुपस्थिस मान्यता देणे.
१४) मा. अध्यक्षांच्या अनुमतीने सभासदांनी आयत्यावेळी उपस्थित केलेल्या विषयावर चर्चा करणे.

स्थळ - वाळवा
दिनांक - ३० ऑगस्ट २०१९

मा. संचालक मंडळाचे आदेशावरुन
**एस. बी. चौगुले**
जनरल मॅनेजर

### सूचना

१) वार्षिक अहवाल, ताळेबंद व नफा तोटा पत्रक हे बँकेच्या मुख्य कार्यालयात आणि सर्व शाखांमधून सभासदांसाठी पुर्व सुचनेनुसार उपलब्ध करून देणेत येईल.
२) गणसंख्येअभावी (कोरम) सभा तहकूब झाल्यास ती त्याच दिवशी त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर घेण्यात येईल. त्यास गणसंख्यापूर्तीचे बंधन राहणार नाही.
३) सभासदांना काही प्रश्न विचारावयाचे असतील तर ते प्रश्न दिनांक ०९/०९/२०१९ पूर्वी बँकेच्या कार्यालयात लेखी सादर करावेत.
४) नवीन पोटनियमानुसार बँकेच्या भागाची दर्शनी किंमत रू. १,००० झाली असून ज्या सभासदांचे भागभांडवल अपुरे आहे त्यांनी ते पुर्ण करावे.
५) नवीन पोटनियमानुसार प्रत्येक सभासदांने पाच वर्षातून किमान एकदा वार्षिक सभेस उपस्थित राहणे आवश्यक आहे.

## संचालक मंडळ

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. किरण नागनाथ नायकवडी | चेअरमन | वाळवा |
| २. | श्री. महंमद अली चाऊस | व्हा. चेअरमन | वाळवा |
| ३. | सौ. नंदिनी वैभव नायकवडी महिला राखीव | संचालिका | वाळवा |
| ४. | श्री. भिमराव कृष्णा कदम | संचालक | मसुचीवाडी |
| ५. | श्री. गंगाराम रामचंद्र सुर्यवंशी | संचालक | सुर्यगांव |
| ६. | श्री. रामचंद्र हणमंत पाटील | संचालक | पुणदी |
| ७. | श्री. अर्जुन निवृत्ती वडगांवे | संचालक | कवठेपिरान |
| ८. | श्री. दिलीप कृष्णराव पाटील | संचालक | नागराळे |
| ९. | श्री. प्रकाश बापू जाधव (दि. १८/४/२०१८ अखेर) | संचालक | नवेखेड |
| १०. | श्री. श्रीकांत तुकाराम आंबी वि.जा./भ.ज./वि.मा. प्रवर्ग | संचालक | जुनेखेड |
| ११. | श्री. बाजीराव ईश्वरा मांगलेकर | संचालक | नागठाणे |
| १२. | श्री. शरद रघुनाथ खोत | संचालक | पडवळवाडी |
| १३. | श्री. आनंदराव राजाराम थोरात | संचालक | गोटखिंडी |
| १४. | श्री. अरूण शंकर यादव | संचालक | अहिरवाडी |
| १५. | श्री. पोपट धुळाप्पा कांबळे अनुसूचित जाती/जमाती | संचालक | वाळवा |
| १६. | कै. सौ. सुमती शामगौंडा पाटील महिला राखीव (दि. ६/२/२०१९ अखेर) | संचालिका | वाळवा |
| १७. | श्री. नारायण हिंदूराव गुरव इतर मागासप्रवर्ग | संचालक | शिरगांव |
| १८. | श्री. बिपीन एस शेटे चार्टर्ड अकौंटंट | तज्ञ संचालक | कोल्हापूर |
| १९. | श्री. श्रीनिवास एन. भोसले चार्टर्ड अकौंटंट | तज्ञ संचालक | सांगली |

# ANNEXURE - A

| | | |
|---|---|---|
| Name of the Bank | : | HUTATMA SAHAKARI BANK LTD., WALWA |
| Head Office Address | : | Kamgar Bhawan, At.&P. Walwa, Tal. Walwa, Dist - Sangli. 416 313 (Maharashtra) |
| No. of Registration | : | SAN/WVA/BNK/0/103/96-97 |
| Date Of Registration | : | 15/05/1996 |
| No. of RBI Licence | : | UBD/MH/1257P |
| Date | : | 12/07/1996 |
| Jurisdiction | : | Maharashtra State |
| No of branches including Head Office | : | 17 |
| On site ATM | : | 4 |
| Extension counter | : | Nil |
| Membership | : | Regular - 7,929 |
| Paid up Share Capital | : | Rs. 438.95 Lakh |
| Reserves & other funds | : | Rs. 4361.10 Lakh |
| Deposits - Current | : | Rs. 780.81 Lakh |
| Savings | : | Rs. 8,581.40 Lakh |
| Cash Credit Cr. Bal. | : | Rs. 23.79 Lakh |
| Term | : | Rs. 31,376.84 Lakh |
| Total | : | Rs. 40,762.84 Lakh |
| Loans & Advances | | |
| Secured | : | Rs. 25,078.98 Lakh |
| Unsecured | : | Rs. 52.60 Lakh |
| Total | : | Rs. 25,131.58 Lakh |
| Priority Sector | : | Rs. 14,527.45 Lakh |
| Weakar Section | : | Rs. 7,488.06 Lakh |
| Borrowings | : | Nil |
| Investment | : | Rs. 18,125.51 Lakh |
| Overdues (Percentage) | : | 3.88% |
| Audit Classification | : | 'A' |
| Profit for the Current year | : | Rs. 351.29 Lakh |
| Total Staff | : | 113 |
| Working Capital | : | Rs. 46,548.46 Lakh |

# २३ वा वार्षिक अहवाल

## सन २०१८-२०१९

**सन्माननीय सभासद बंधु-भगिनींनो,**

आपल्या बँकेच्या २३ व्या वार्षिक सर्व साधारण सभेस सर्वजण उपस्थित राहिलात याबद्दल मी व्यक्तीशः व संचालक मंडळातील माझे सर्व सहकारी यांचेवतीने आपणा सर्वांचे मन:पूर्वक हार्दिक स्वागत करतो.

हुतात्मा संकुलाचे संस्थापक, गोरगरीब, कष्टकरी, शेतकऱ्यांचे दैवत, सर्वसामान्यांचे व आपल्या सर्वांचे भूषण आदरणीय **पद्मभूषण क्रांतिवीर डॉ. नागनाथ (अण्णा) नायकवडी** यांची ९७ वी जयंती १५ जुलै २०१९ रोजी साजरी करणेत आली. अण्णांचे कार्य म्हणजे स्वच्छ व पारदर्शक कारभाराचे प्रतीक आहे आणि हुतात्मा संकुलातील प्रत्येक घटक त्यांनी घालून दिलेल्या आदर्शाशी बांधील राहील.

मा. संचालक मंडळाच्यावतीने आपल्या बँकेच्या सन २०१८-२०१९ या आर्थिक वर्षाचा ताळेबंद, नफा-तोटा पत्रक व २३ वा वार्षिक अहवाल सादर करताना मला सार्थ अभिमान वाटतो.

बँकेने गेल्या तेवीस वर्षात भरीव प्रगती केलेली आहे. प्रगतीचा हा टप्पा गाठण्यासाठी माझे सर्व सहकारी संचालक, कार्यकर्ते, सर्व अधिकारी, कर्मचारी यांचे कृतीशिल अथक प्रयत्न तसेच आपण सर्व सभासद, ठेवीदार, कर्जदार, ग्राहक व हितचिंतक यांचे भक्कम पाठबळ तसेच बहुमोल सहकार्य मिळाले आहे. तसेच आपल्या सर्वांचा पारदर्शक कारभार, सुसंवाद आणि सांघिकवृत्ती यामुळेच बँकेला आजवरची प्रगती साध्य करता आलेली आहे हे मला आवर्जून नमूद करावेसे वाटते.

*** भाग भांडवल व निधी : रु. ४८००.०५ लाख**

३१ मार्च २०१८ रोजी वसूल भाग भांडवल रु. ४२१.३४ लाख इतके होते. त्यामध्ये अहवाल सालात रु. १७.६१ लाख इतकी वाढ होऊन ३१ मार्च २०१९ रोजी वसूल भाग भांडवल रु. ४३८.९५ लाख झालेले आहे.

सन २०१८–२०१९ या आर्थिक वर्षात राखीव निधी व इतर निधीमध्ये रु. ६४९.४८ लाख वाढ होऊन निधी रु. ४३६१.१० लाख झालेला आहे. भागभांडवल व निधीचे खेळत्या भांडवलाशी प्रमाण १०.३१% इतके आहे.

### * ठेवी : रु. ४०७६२.८४ लाख

३१ मार्च २०१८ रोजी बँकेकडे रु. ३४५१६.२५ लाखाच्या ठेवी होत्या. अहवाल सालामध्ये ठेवीमध्ये रु. ६२४६.५९ लाखांनी वाढ होवून अहवाल सालात ठेवी एकूण रू. ४०७६२.८४ लाख इतक्या झाल्या आहेत.

### * गुंतवणूक : रु. १८१२५.५१ लाख

रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या CRR आणि SLR याबाबतच्या सूचनांचे काटेकोर पालन बँकेने केले आहे. आपल्या बँकेला एनडीटीएलच्या ४% रक्कम CRR व १९.२५% रक्कम SLR म्हणून ठेवावी लागते. दिनांक ३१ मार्च २०१९ अखेर बँकेची गुंतवणूक रू. १८१२५.५१ लाख इतकी असून त्यात सरकारी रोख्यातील गुंतवणूक रू.१२९८०.९८ लाख तसेच इतर बँकाकडील मुदत ठेवी रू. ५१४०.३७ लाख व इतर सहकारी संस्थांच्या शेअर्समधील गुंतवणूक रू. ४.१६ लाख यांचा समावेश आहे.

### * कर्ज व्यवहार : रु. २५१३१.५८ लाख

दिनांक ३१ मार्च २०१९ अखेर अहवाल सालात बँकेच्या कर्जामध्ये रू. ३५७५.६९ लाख इतकी वाढ होऊन बँकेची एकूण कर्जे रू. २५१३१.५८ लाख इतकी झाली. बँकेने अग्रक्रम क्षेत्रासाठी दिलेल्या कर्जाचे एकूण कर्जाशी प्रमाण ५७.८०% इतके आहे व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी केलेल्या कर्जपुरवठ्याचे एकूण कर्जाशी प्रमाण २१.९८% इतके आहे.

### * भांडवल पर्याप्तता प्रमाण : (CRAR)

भारतीय रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक तत्वानुसार भांडवल पर्याप्तता प्रमाण कमीतकमी ९% असणे आवश्यक आहे. आपल्या बँकेचे ३१ मार्च २०१९ रोजीचे भांडवल पर्याप्तता प्रमाण (CRAR) १३.८९% इतके आहे. यापुढेही भांडवल वाढीचा वेग व्यवसाय वाढीशी सुसंगत ठेवण्याचा व CRAR चांगला राखण्याचा प्रयत्न केला जाईल.

### * थकबाकी :

दि. ३१ मार्च २०१९ अखेर कर्जाची येणे बाकी रू. २५१३१.५८ लाख असून त्यापैकी रु. ९७५.८२

लाख इतकी थकबाकी आहे. थकबाकीचे एकूण कर्जाशी प्रमाण ३.३३ % इतके आहे. थकबाकी कमी असणे हेच सदृढ बँकेचे लक्षण आहे. संचालक मंडळ, अधिकारी वर्ग व सर्व कर्मचारी वर्गाने अथक प्रयत्न करून थकबाकीचे प्रमाण कमी ठेवले आहे. तसेच सभासद थकबाकीदारांनी त्यांचेकडील संपूर्ण थक रक्कम विनाविलंब भरून बँकेस सहकार्य करावे अशी विनंती मी करू इच्छितो.

### * उत्पन्न संकल्पना, जिंदगीची वर्गवारी व तरतुदी : (NPA)

भारतीय रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार अनुत्पादीत कर्जाचे वर्गीकरण करून याबाबतच्या सुचनांचे पालन केलेले आहे. अहवाल साल अखेरीस एकूण कर्जे रू. २५१३१.५८ लाख इतकी असून त्यापैकी रू. ७८९.२६ लाख इतक्या रकमेची कर्जे अनुत्पादीत कर्जे आहेत. दिनांक ३१ मार्च २०१८ रोजी अनुत्पादीत कर्जाचे एकूण कर्जाशी प्रमाण ३.२१% इतके होते. ते यावर्षी दिनांक ३१ मार्च २०१९ रोजी हे प्रमाण ३.१४% इतके कमी झाले आहे. या संपूर्ण अनुत्पादीत कर्जांची तरतूद केलेली असून अनुत्पादीत कर्जासाठी केलेल्या तरतूदीची (संशयीत व बुडीत कर्ज निधी) रक्कम रू. २२३८.४० लाख इतकी आहे. ढोबळ एन.पी.ए. च्या रक्कमेपेक्षा ही तरतूद रू. १४४९.१४ लाखाने जास्त असलेने गेल्या आठ वर्षाप्रमाणेच दि. ३१ मार्च २०१९ चा नेट एन.पी.ए. ०.००% (शुन्य टक्के) आहे. भविष्यातही हे प्रमाण शुन्य टक्के ठेवणेचा प्रयत्न राहील. त्याव्यतिरिक्त उत्पादक कर्जाकरीता रू. ११५.०० लाख इतकी तरतूद केली आहे.

### * कोअर बँकींग प्रणाली : (CBS)

फेब्रुवारी २०१४ पासून सर्व शाखांमध्ये कोअर बँक प्रणाली (सी.बी.एस.) कार्यान्वयीत करणेत आली असून आता आपल्या खातेदारांना कोणत्याही शाखेतून आपले व्यवहार करणे शक्य झाले आहे. तसेच **मोबाईल बँकींग, आरटीजीएस, एनईएफटी, एटीएम, पॉस, ईसीएस, बीबीपीएस, आधार कार्ड लिंक सबसिडी, प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा व प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजने यासारख्या सर्व सुविधा** बँकेमार्फत उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

### * शाखा विस्तार :

बँकेच्या एकूण १६ शाखा कार्यरत असून या सर्व शाखांचे काम समाधानकारक आहे.

### * वैधानिक लेखापरिक्षण व समावर्ती अंतर्गत लेखापरीक्षण :

सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण मे. डी. एस. पाटील ॲण्ड कंपनी, चार्टर्ड अकौंटंट

यांनी केलेले असून त्यांनी महाराष्ट्र सहकारी संस्थांचा कायदा १९६० खालील नियमानुसार बँकेचा ऑडिट वर्ग 'अ' कायम केला आहे. तसेच वाळवा, कोल्हापूर, सांगली व इस्लामपूर या शाखांचे समावर्ती अंतर्गत लेखापरिक्षण कुंभोजकर, कुलकर्णी, देशपांडे ॲण्ड असोसिएट्स, कोल्हापूर यांनी केले आहे. लेखापरिक्षणाच्यावेळी त्यांनी केलेले बहुमोल मार्गदर्शन व सुचना यांचा बँकेच्या कामकाजामध्ये निश्चितच उपयोग होईल.

### ❊ रिझर्व्ह बँक तपासणी :

दि. ३१ मार्च २०१८ रोजीच्या आर्थिक स्थितीवर आधारीत ११ वी रिझर्व्ह बँक तपासणी दि. १२ फेब्रुवारी २०१९ रोजी पूर्ण झाली. याबाबतचा दोष दुरूस्ती अहवाल मुदतीत पाठविला आहे. रिझर्व्ह बँकेच्या अधिकाऱ्यांनी सदर तपासणी दरम्यान त्यांचेकडून कामकाजाबाबत समाधान व्यक्त केले असून त्यांनी केलेले बहुमोल मार्गदर्शन व सुचनाबद्दल त्यांचे आम्ही आभारी आहोत. भारतीय रिझर्व्ह बँकेने वेळोवेळी दिलेल्या मार्गदर्शक तत्वाची व सुचनांची काटेकोर अंमलबजावणी करून आम्ही बँकेचे धोरण निश्चित करीत आलो आहोत.

### ❊ कार्यक्षेत्र :

आपल्या बँकेचे कार्यक्षेत्र संपूर्ण महाराष्ट्र राज्य आहे.

### ❊ ठेवीवरील विमा संरक्षण :

डिपॉझिट इन्शुरन्स ॲन्ड क्रेडीट गॅरंटी कार्पोरेशन, मुंबई यांचेमार्फत आपले बँकेकडील प्रत्येक ठेव खातेदाराचे रू. १,००,०००/- पर्यंतच्या ठेवींना विमा संरक्षण उपलब्ध आहे. बँकेने सप्टेंबर २०१९ पर्यंतचा ठेवीवरील विम्याचा हप्ता कार्पोरेशनकडे पाठवला आहे.

### ❊ संचालक मंडळ व त्यांच्या नातेवाईकांना दिलेली कर्जे :

संचालक व त्यांचे नातेवाईक यांना तसेच संबंधितांच्या उद्योगधंद्यांना कर्ज देण्याबाबत रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक तत्वांचे पालन केले असून अहवाल सालात कोणत्याही संचालकास व त्यांच्या नातेवाईकांना कोणतेही कर्ज दिलेली नाही.

### ❊ संचालक मंडळ सभा :

अहवाल सालात संचालक मंडळाच्या १५ व कर्ज मंजूर समितीच्या ३६ सभा झाल्या असून संचालक

मंडळाने सर्व निर्णय एकमताने घेतलेले आहेत.

**✻ नफा विभागणी :**

सन २०१८–२०१९ या आर्थिक वर्षात आपल्या बँकेस रु. ३,५१,२८,७०२.२० इतका निव्वळ नफा झाला आहे. गतवर्षाचा शिल्लक नफा रू. ७१६.०४ व या आर्थिक वर्षाचा नफा मिळून रु. ३,५१,२९,४१८.२४ ची नफा विभागणी खालीलप्रमाणे करण्याची संचालक मंडळाने शिफारस केली आहे. त्यास आपण मंजूरी द्यावी ही विनंती. अहवाल सालासाठी सभासदांना १२% प्रमाणे लाभांश देणेची शिफारस संचालक मंडळाने केली आहे. त्यास मान्यता द्यावी.

| तपशील | रक्कम रुपये पैसे |
|---|---|
| १) राखीव निधी (२५% पेक्षा कमी नाही) | १,९८,६६,०००.०० |
| २) तंत्रज्ञान निधी | ३५,००,०००.०० |
| ३) गुंतवणूक चढउतार निधी | ६०,००,०००.०० |
| ४) संचालक आणि सेवक ट्रेनिंग फंड | १,००,०००.०० |
| ५) लाभांश समिकरण निधी | ५,५०,०००.०० |
| ६) सेवक कल्याण निधी | १,००,०००.०० |
| ७) लाभांश (१२% प्रमाणे) | ५०,१३,०००.०० |
| ८) शिल्लक नफा | ४१८.२४ |
| एकूण | ३,५१,२९,४१८.२४ |

त्यानुसार आपल्या बँकेच्याही कार्यप्रणालीत बदल घडविण्यासाठी निधी व्यवस्थापन, थकबाकी वसुलीबाबत कायदेशीर बाबी, संगणकीकरण इ. विषयावर वेळोवेळी भारतीय रिझर्व्ह बँकेच्या कृषी व बँकींग महाविद्यालय पुणे, गुलाबराव पाटील सहकारी प्रशिक्षण केंद्र, सांगली बँक असोसिएशन सांगली व कोल्हापूर यांनी आयोजित केलेल्या प्रशिक्षणकरीता आपले अधिकारी व कर्मचारी पाठविण्यात आले होते. तसेच संचालकांनाही एक दिवसाचे प्रशिक्षण आयोजित केलेले होते.

**✻ कर्मचारी वर्ग :**

व्यवस्थापनाने आखलेली ध्येय धोरणे प्रत्यक्षात आणणारा महत्वाचा घटक म्हणजे कर्मचारी होय.

सद्याच्या स्पर्धेच्या युगात ग्राहकांना कार्यक्षम व तत्पर सेवा देऊन बँकेच्या ध्येय धोरणांची अंमलबजावणी कर्मचारी वर्गाने कार्यक्षमपणे केलेली आहे. दि. ३१ मार्च २०१९ अखेर बँकेकडे एकूण ११३ इतका कर्मचारी वर्ग कार्यरत आहे.

**✻ कृतज्ञता व आभार :**

बँकेच्या दैनंदिन व्यवहारामध्ये ज्या ज्या व्यक्तींनी बहुमोल सहकार्य केले त्यांचे ऋणनिर्देश व कृतज्ञता व्यक्त करणे हे मी माझे कर्तव्य समजतो. बँकेचे सभासद, ठेवीदार, कर्जदार व हितचिंतक यांनी बँकेवर निस्सिम प्रेम व आपुलकी व्यक्त केली आहे. त्याबद्दल त्यांचे संचालक मंडळाचेवतीने आभार मानतो.

समाजातील सर्व घटकांचा आर्थिक विकास व्हावा म्हणून हुतात्मा संकुलाचे नेते **मा. वैभव (काका) नायकवडी** यांनी १५ ऑगस्ट १९९६ रोजी हुतात्मा बँकेची स्थापना केली. कर्मचाऱ्यांच्या कामात गतीमानता येवून कार्यक्षमता वाढावी, बँकेची प्रगतीपथावर वाटचाल व्हावी तसेच भारतीय रिझर्व्ह बँक व सहकार खाते यांच्या मार्गदर्शक तत्वानूसार बँकेचे स्वच्छ व पारदर्शक काम चालावे याकरिता दैनंदिन कारभारात संस्थापक **मा. वैभव (काका) नायकवडी** यांचे मोलाचे मार्गदर्शन मिळत आहे.

**मा. नामदार चंद्रकांत दादा पाटील,** महसुल, पुनर्वसन व सार्वजनिक बांधकाम मंत्री, महाराष्ट्र राज्य, **मा. नामदार सुभाषराव देशमुख**, सहकार, पणन व वस्त्रोद्योग मंत्री, महाराष्ट्र राज्य, सहकारी चळवळीच्या व नागरी सहकारी बँकांच्या समस्या सोडविण्याकरिता सक्रीय पुढाकार घेणारे **माजी केंद्रिय मंत्री मा. श्री. शरदचंद्रजी पवार, मा. श्री. सतीश सोनी,** सहकार आयुक्त, पुणे, **मा. डॉ. किशोर तोसणीवाल,** अप्पर आयुक्त व विशेष निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे, **मा. श्री. श्रीकृष्ण वाडेकर,** विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था, कोल्हापूर, **श्री. निळकंठ करे,** जिल्हा उपनिबंधक, सांगली, **मा. श्रीमती रंजना बारहत्ते** सहाय्यक निबंधक, इस्लामपूर, तसेच बँकेच्या संचालिका व हुतात्मा बझारच्या कार्यवाह **सौ. नंदिनी (काकी) नायकवडी,** जिल्हा परिषद सांगलीच्या महिला व बालकल्याण सभापती व क्रांतिसिंह नाना पाटील महाविद्यालय वाळवाच्या **प्राचार्या डॉ. सुषमा अरुण नायकवडी** व हुतात्मा दूध संघाचे चेअरमन **मा. श्री. गौरवभाऊ नायकवडी** या मान्यवरांनी बँकेस वेळोवेळी केलेल्या मार्गदर्शनाबद्दल संचालक मंडळ त्यांचे आभारी आहे.

बँकेच्या कार्यक्षेत्रातील सर्व ग्रामपंचायती, सहकारी संस्था, गांव कामगार तलाठी, महसूल विभाग, सर्व

सर्वांचे मनःपूर्वक आभार मानने माझे कर्तव्य समजतो. तसेच बँकेस पद्मभूषण क्रांतिवीर डॉ. नागनाथअण्णा नायकवडी हुतात्मा किसन अहिर सहकारी साखर कारखाना, हुतात्मा दूध उत्पादक संघ, हुतात्मा बझार या सर्व संस्थांचे चेअरमन, व्हा. चेअरमन, संचालक मंडळ, कार्यकारी संचालक, सेवक वर्ग यांचेकडून मिळत असलेल्या सहकार्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो.

आपल्या बँकेचे संस्थापक चेअरमन **अरुण (भैय्या) नायकवडी** यांचे प्रेरणादायी नेतृत्व व अमुल्य मार्गदर्शन नियतीने हिरावून घेतले. त्यांच्या मार्गदर्शनाची पवित्र ज्योत भविष्यकाळात तेवत ठेवण्याची जबाबदारी पार पाडणे हीच त्यांना खरी श्रध्दांजली ठरणार आहे.

हुतात्मा किसन अहिर विद्यालय, जिजामाता विद्यालय, क्रांतिसिंह नाना पाटील महाविद्यालय, हुतात्मा किसन अहिर शिशुविहार व प्राथमिक शाळा, क्रांतिसिंह नाना पाटील सह. शेती माल प्रक्रिया संस्था, क्रांतिसिंह ग्रेप ग्रोअर्स, हुतात्मा नागरी पतसंस्था, हुतात्मा कारखाना कामगार पतसंस्था, हुतात्मा नर्सिंग कॉलेज तसेच इतर अनेक सहकारी संस्था व हितचिंतक यांचेकडून वेळोवेळी मिळालेल्या सहकार्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

योगदान देणाऱ्या माझ्या सर्व सहकारी संचालकांचे, बँकेचे अधिकारी, कर्मचारी व हुतात्मा समुहाचे आभार मानतो. या बँकेची थोर परंपरा, नावलौकिक व व्यवसाय विकास यापुढेही सतत वाढत जावो यासाठी आपल्या सर्वांच्या सदिच्छा व सहकार्याच्या भावना सतत मिळत राहो, अशी अपेक्षा व्यक्त करतो व हा अहवाल आपल्यापुढे मंजूरीकरिता सादर करतो. धन्यवाद...!

**जयहिंद..** **जय महाराष्ट्र...** **जय सहकार....**

आपला स्नेहांकित,
**किरण नागनाथ नायकवडी**
चेअरमन
हुतात्मा सहकारी बँक लि., वाळवा.

## वैधानिक लेखापरिक्षकांचा शेरा

आम्ही हुतात्मा सहकारी बँक लि., वाळवा ता. वाळवा, जि. सांगली या सहकारी बँकेचे ता. ३१ मार्च २०१९ रोजी संपणाऱ्या वर्षाचे नफातोटा पत्रक व ता. ३१ मार्च २०१९ रोजीचा परिशिष्टीय ताळेबंद, संस्थेने ठेवलेली हिशोब पुस्तके, व्हौचर्स व मला उपलब्ध करून दिलेल्या अन्य कागदपत्रावरून तपासला असून आमचे वैधानिक लेखापरिक्षणाचे कामासाठी व त्यांचे पुर्ततेसाठी आम्हाला आवश्यक ती माहिती व खुलासे मिळाले आहेत. त्यानुसार आमच्या मते....

१) हिशोबी पुस्तकाच्या तपासणीतून जितपत दृष्टोत्पत्तीस येईल त्यावरून, संस्थेने महाराष्ट्र राज्य सहकारी संस्थांचा १९६० चा कायदा व त्याखालील नियम व संस्थेच्या पोटनियमान्वये अपेक्षित असल्यानुसार योग्य ती हिशोबाची पुस्तके ठेवली आहेत.

२) आम्ही तपासलेला ताळेबंद व नफा-तोटा पत्रके, संस्थेच्या हिशोबांच्या पुस्तकांशी व विवरणाशी जुळत आहेत.

३) आमच्या मते देण्यात आलेल्या संपूर्ण माहितीप्रमाणे, तसेच आम्हाला प्राप्त झालेल्या सर्व शाखांच्या हिशोब पत्रकानुसार आणि आम्हाला देण्यात आलेल्या खुशालावरून हे हिशेब महाराष्ट्र सहकारी संस्थांचा १९६० व त्याखालील नियमान्वये अपेक्षित अशा रितीने आवश्यक ती माहिती देतात.

आमच्या लेखापरिक्षण अहवाल भाग अ,ब,क व परिशिष्ठ यामध्ये नमूद केलेल्या अवलोकनास अनुसरून -

अ) ताळेबंद पत्रकाबाबत दि. ३१ मार्च २०१९ या दिवशी च्या संस्थेच्या आर्थिक परिस्थितीची

व

ब) नफा-तोटा पत्रकाचे बाबतीत त्या दिनांकास संपणाऱ्या आर्थिक वर्षाच्या नफ्याची सत्य व वास्तव स्थिती दर्शवित आहे.

४) सन २०१८-२०१९ या वर्षासाठी महाराष्ट्र सहकारी संस्थांचा कायदा १९६० खालील नियमानुसार संस्थेस **"अ"** वर्ग कायम करणेत येत आहे.

दिनांक : १२/०७/२०१९

स्थळ : कोल्हापूर

**मे. डी. एस. पाटील आणि कंपनी**

चार्टर्ड अकौटंट्स, कोल्हापूर

पार्टनर

(पॅनल क्र. १०११६१६)

## दि. ३१ मार्च २०१९

| दि. ३१/३/२०१८ रुपये पैसे | भांडवल व देणी | रुपये पैसे | दि. ३१/३/२०१९ रुपये पैसे |
|---|---|---|---|
| **५,००,००,०००.००** | **१) अधिकृत भाग भांडवल** | **१५,००,००,०००.००** | **१५,००,००,०००.००** |
| **४,२१,३४,४००.००** | **२) वसूल भाग भांडवल** | ४,३८,९४,९००.०० | **४,३८,९४,९००.००** |
| **३७,११,६२,०४१.००** | **३) राखीव निधी व इतर निधी** | | **४३,६१,१०,३०३.००** |
| ६,३५,१२,५८६.०० | १) राखीव निधी | ७,५६,२२,०८६.०० | |
| ५,५०,००,०००.०० | २) इमारत निधी | ५,५०,००,०००.०० | |
| ३२,००,०००.०० | ३) स्पेशल रिझर्व्ह फंड | ३२,००,०००.०० | |
| ३०,००,०००.०० | ४) लाभांश समीकरण निधी | ४०,५०,०००.०० | |
| १८,६८,४०,०००.०० | ५) बुडीत संशयीत कर्जे निधी | २२,३८,४०,०००.०० | |
| १,००,००,०००.०० | ६) उत्तम जिंदगीवरील निधी | १,१५,००,०००.०० | |
| २५,००,०००.०० | ७) धर्मादाय निधी | २५,००,०००.०० | |
| १५,००,०००.०० | ८) सेवक कल्याण निधी | १५,००,०००.०० | |
| २,००,००,०००.०० | ९) गुंतवणूक चढउतार निधी | २,९०,००,०००.०० | |
| ४,१६,०००.०० | १०) भागभांडवल गुंतवणुक निधी | ४,१६,०००.०० | |
| २,२४,९३,४५५.०० | ११) गुंतवणुक घसारा निधी | २,५१,६७,२१७.०० | |
| २२,००,०००.०० | १२) रौप्य महोत्सव निधी | २५,००,०००.०० | |
| ५,००,०००.०० | १३) संचालक आणि सेवक ट्रेनिंग फंड | ९,००,०००.०० | |
| ०.०० | १४) कर्मचारी ग्रॅच्युईटी व फंड | ९,१५,०००.०० | |
| **३,४५,१६,२५,५५८.९५** | **४) ठेवी** | | **४,०७,६२,८३,७८३.३४** |
| २,२९,७९,३२,१४७.३५ | अ) मुदत ठेवी | ३,१३,७६,८३,७९६.३५ | |
| **९८,६८,१८,४५०.८८** | ब) सेव्हिंग्ज ठेवी | **८५,८१,४०,११६.७०** | |
| ९४,६५,६८,३५८.९७ | १) व्यक्ती सेव्हिंग ठेवी | ८३,०१,०३,८५६.६९ | |
| ४,०२,५०,०९१.९१ | २) सेव्हिंग्ज सस्पेन्स | २,८०,३६,२६०.०१ | |
| **१६,६५,८१,९००.४५** | क) चालू ठेवी | **७,८०,८१,१८८.१७** | |
| १६,६५,८१,९००.४५ | १) करंट ठेवी | ७,८०,८१,१८८.१७ | |
| **२,९३,०६०.२७** | ड) सी.सी. क्रेडिट बॅलन्स | **२३,७८,६८२.१२** | |
| **०.००** | **५) बाहेरील कर्जे** | | ०.०० |
| **०.००** | **६) वसूलीस घेतलेली बिले (उलट बाजू प्रमाणे)** | | ०.०० |
| **२२,७६,७५,९०६.००** | **७) थकव्याज तरतूद** | | **२४,७३,२४,६९४.००** |
| २२,७६,७५,९०६.०० | १) कर्जावरील थकव्याज तरतूद | २४,७३,२४,६९४.०० | |
| **१,५१,६५,८५४.००** | **८) जादा व्याज व इतर तरतूद** | | **१,९३,१४,६९४.००** |
| १,२६,५२,३१२.०० | १) कर्जावरील जादा व्याज तरतूद | १,६३,२६,९१४.०० | |
| २५,१३,५४२.०० | २) विमा व इतर चार्जेस | २९,८७,७८०.०० | |
| **१,९६,८१,३५८.००** | **९) देणे व्याज** | | **३,११,९५,०९४.००** |
| १,९६,८१,३५८.०० | अ) ठेवीवरील व्याज | ३,११,९५,०९४.०० | |
| **०.००** | **१०) शाखा जुळवणी** | | **०.००** |
| **३,६५,०९,४५३.७१** | **११) इतर देणी व तरतुदी** | | **४,८२,४५,५२१.३३** |
| ६,५०,०००.०० | १) वैधानिक लेखापरीक्षण फी | ७,००,०००.०० | |
| २,००,०००.०० | २) अंतर्गत लेखापरिक्षण फी | २,५०,०००.०० | |
| ४१,७१५.०० | ३) टेलिफोन | ७१,२५०.०० | |
| ६८,९२,५४२.०० | ४) नोकर बोनस | ७८,०८,७०३.०० | |
| ६७,३००.०० | ५) ऑफिस भाडे व लाईट बील देणे | ६९,४००.०० | |
| २२,४६,११४.०० | ६) ड्राफ्ट पेएबल | ५,२०,००५.०० | |
| १६,१३,०४२.०० | ७) इतर देणी | १६,६२,७४२.०० | |
| ५,१६,९१०.०० | ८) कर्मचारी उपदान (ग्रॅच्युइटी) | ९,३५,६६७.०० | |
| ३२,३२,२२१.६२ | ९) अनामत | ३३,६१,९५७.६२ | |
| ४,१४,२९,०५,००२.५७ | **बेरीज पुढील पानावर** | ४,८६,९५,०३,१९२.९६ | ४,९०,२३,६८,९८९.६७ |

## चा ताळेबंद

| दि. ३१/३/२०१८ रुपये पैसे | मालमत्ता व येणी | रुपये पैसे | दि. ३१/३/२०१९ रुपये पैसे |
|---|---|---|---|
| **७,०२,५३,२८१.७५** | **१) रोख शिल्लक** | ८,७४,४७,८४९.८७ | ८,७४,४८,१७४.८७ |
| **२,१३५.००** | **२) स्टँप इन हॅन्ड** | ३२५.०० | |
| **४३,७४,१५,५७४.११** | **३) बँक शिल्लक** | | १६,२३,५७,०३२.६६ |
| **७,८९,६५,७२१.५२** | **अ) राज्य व जिल्हा मध्य बँकातील शिल्लक** | **४,२१,८४,६०६.१७** | |
| २,१६,०८८.६५ | १) एम.एस्सी. बँक मुंबई (प्रधान कार्यालय) | २,१६,१८८.६५ | |
| ३,८७,१४,४०१.६६ | २) सांगली जिल्हा मध्य सह. बँक लि; | ३,१८,३७,२२४.३१ | |
| ३,०३,८६,१२०.२१ | ३) कोल्हापूर जिल्हा मध्य सह.बँक लि; | ५८,५४,८१३.२१ | |
| ९६,४९,१११.०० | ४) सातारा जिल्हा मध्य. सह बँक लि., | ४२,७६,३८०.०० | |
| **३५,८४,४९,८५२.५९** | **ब) इतर बँकातील शिल्लक** | **१२,०१,७२,४२६.४९** | |
| ४,८०,७७,१८३.६४ | १) स्टेट बँक ऑफ इंडिया | ११,७८,५७३.०६ | |
| ४,११,६४,३६१.८८ | २) बँक ऑफ बडोदा | १८,४४,९७४.८८ | |
| ५६,७४,१९७.८५ | ३) युको बँक | ४,०९,९५५.९६ | |
| ५,५७,४६,५०९.०४ | ४) बँक ऑफ इंडिया | ८,५६,५३९.५४ | |
| १४,४३,२८,५७१.४३ | ५) आय.डी.बी.आय बँक लि; | ८,४६,३८,९८१.६७ | |
| ८९,८५,३३८.२८ | ६) ॲक्सेस बँक लि; | १९,३३,६०५.२८ | |
| ५८,८१,२१०.२५ | ७) एच.डी.एफ.सी.बँक लि; | १,०००.०० | |
| १,५५,१७,४३९.५७ | ८) शामराव विठ्ठल को ऑप बँक लि; | ०.०० | |
| २,३६,१७,०४०.६५ | ९) आय.सी.आय.सी.आय. बँक | १,६६,९१,६२३.६१ | |
| २,००,०००.०० | १०) टीजेएसबी बँक लि., | ६,३१,३५०.१७ | |
| ०.०० | ११) आरबीएल बँक | १,५७,९४३.६० | |
| ९२,५८,०००.०० | १२) इक्विटास स्मॉल फायनान्स बँक | १,१८,२७,८७८.७२ | |
| **१,१९,७६,३१,९६३.००** | **४) गुंतवणूक** | | १,८१,२५,५१,२५४.०० |
| **६५,६७,४७,५३०.००** | **अ) सरकारी कर्जरोखे** | **१,२९,८०,९८,५४३.००** | |
| **४,१५,५००.००** | **ब) शेअर्स गुंतवणूक** | **४,१५,५००.००** | |
| १,०००.०० | १) एम्.एस्.सी. बँक. लि; मुंबई | १,०००.०० | |
| ४,०१,०००.०० | २) सांगली जि.म. सहकारी बँक लि; | ४,०१,०००.०० | |
| ५००.०० | ३) हुतात्मा बझार, वाळवा | ५००.०० | |
| १,०००.०० | ४) हुतात्मा सह. दूध उत्पादक संघ वाळवा लि; | १,०००.०० | |
| १०,०००.०० | ५) हुतात्मा किसन अहिर सह. साखर कारखाना लि; | १०,०००.०० | |
| १,०००.०० | ६) सांगली जिल्हा सह. बोर्ड सांगली | १,०००.०० | |
| १,०००.०० | ७) कोल्हापूर जिल्हा नागरी सह. बँक असोसिएशन | १,०००.०० | |
| **५४,०४,६८,९३३.००** | **क) मुदत ठेव** | **५१,४०,३७,२११.००** | |
| ८,००,००,०००.०० | १) सातारा जिल्हा मध्यवर्ती सह. बँक | ५,००,००,०००.०० | |
| ५०,००,०००.०० | २) युको बँक | ०.०० | |
| १,२९,६८,९३३.०० | ३) आय.डी.बी.आय. बँक लि; | १,३९,३७,२११.०० | |
| ७,००,००,०००.०० | ४) कोल्हापूर जिल्हा सहकारी मध्य बँक. | १५,००,००,०००.०० | |
| ०.०० | ५) आरबीएल बँक | ५,००,००,०००.०० | |
| १,२५,००,०००.०० | ६) शामराव विठ्ठल को ऑप बँक लि. | ०.०० | |
| १३,००,००,०००.०० | ७) सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., | १०,००,००,०००.०० | |
| १५,००,००,०००.०० | ८) पीएमसी बँक लि., | ०.०० | |
| ३,००,००,०००.०० | ९) भारत को ऑप बँक लि., मुंबई | ०.०० | |
| ०.०० | १०) ए.यु. स्मॉल फायनान्स बँक | ५,००,००,०००.०० | |
| ५,००,००,०००.०० | ११) इक्विटास स्मॉल फायनान्स बँक | १०,०१,००,०००.०० | |
| **२,१५,५५,८८,९११.४४** | **४) कर्जे** | | २,५१,३१,५८,२१९.८० |
| **७१,१७,५३,७९०.६१** | **अ) अल्प मुदत कर्जे** | **१,११,९१,९७,००७.०३** | |
| ६,५८,६३,२६७.६६ | १) सोने तारण कर्जे | ६,६१,३५,९९०.०० | |
| ७,६९,६१,१४३.४३ | २) ठेव तारण कर्जे | १३,३०,९०,७८९.०० | |
| **१,८४,८१,२७,३६४.९५** | **बेरीज पुढील पानावर** | **२,२६,१५,८३,२४०.५३** | ४,५७,५५,१४,६८१.३३ |

## दि. ३१ मार्च २०१९

| दि. ३१/३/२०१८ रुपये पैसे | भांडवल व देणी | रुपये पैसे | दि. ३१/३/२०१९ रुपये पैसे |
|---|---|---|---|
| **४,१४,२९,०५,००२.५७** | **मागील पान बेरीज** | ४,८६,९५,०३,१९२.९६ | ४,९०,२३,६८,९८९.६७ |
| ३,३८,८४६.०० | १०) प्रॉव्हिडंड फंड देणे | ३,६१,३२१.०० | |
| २,३२,१०३.०० | ११) टी.डी.एस. देणे | १४,६६,८०३.०० | |
| २८,९०,०००.०० | १२) क्लोजिंग अलौन्स | ३२,४४,९८३.०० | |
| २६,४७,८३०.०० | १३) राज्य सरकारी कर्ज माफी २००९ | २६,४७,८३०.०० | |
| ०.०० | १४) क्लिअरींग ॲडजेस्टमेंट | ५,२४,६७४.०० | |
| १,३६,००,०००.०० | १५) इन्कम टॅक्स देणे | १,९०,००,०००.०० | |
| ५,०२,१३२.३६ | १६) ए.टी.एम.एन.एफ.एस. | २६,७८,०९७.३३ | |
| १,०९,७०४.७७ | १७) ए.टी.एम.पी.ओ.एस | १३,६२२.३२ | |
| ३,६४,४७६.४८ | १८) सीजीएसटी देणे | ४,९८,६०३.५३ | |
| ३,६४,४७६.४८ | १९) एसजीएसटी देणे | ४,९८,६०३.५३ | |
| ०.०० | २०) पगार देणे खाते | १९,३१,२५९.०० | |
| **२,८०,५०,४३१.०४** | **१२) नफा** | | ३,५१,२९,४१८.२४ |
| ६८८.४७ | १) मागील वर्षाचा शिल्लक नफा | ७१६.०४ | |
| २,८०,४९,७४२.५७ | २) चालू नफा | ३,५१,२८,७०२.२० | |
| | **संभाव्य जबाबदारी** | | |
